MHSI040004492013

**रे. दी. मु. नं.**
**११२/२०१३**
**सरस्वती सडवेलकर वि. सुधाकर सावंत**

## निशाणी ९७ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी निशाणी २५ येथील काढलेल्या मुद्यामधील मुद्दा क्र. ४ सुधारित मुद्दा काढणेकरीता दाखल केला आहे.

**२.** वादीचे अर्जातील कथन असे की, निशाणी ५ येथे काढलेल्या मुद्यामधील मुद्दा क्र. ४ " वादिस विनंतीप्रमाणे दावा मिळकतीच्या मालकीचा जाहीर ठराव मिळणेचा अधिकार आहे का ? " सदरचा मुद्दा हा वादीच्या दाव्यातील विनंतीच्या अनुषंगाने काढलेला आहे. त्यांनी त्यांच्या विनंती सदरात दावा मिळकतीचे मालक आहेत असा ठराव करून मागितला नाही. सदरचा मुद्दा कथनाला धरून नाही. वादीच्या दाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादीने तोडलेली झाडे ही वादीच्या मालकीची आहेत परंतु, त्याचा उल्लेख मुद्यामध्ये नाही. त्यामुळे वादीच्या दाव्यातील मागणीच्या अनुषंगाने पुढील मुद्दा काढणे आवश्यक आहे. "वादिस विनंतीप्रमाणे दावा मिळकतीमधील प्रतिवादीने तोडलेल्या झाडांचा वादी हा मालक आहे असा जाहीर ठराव करून मिळणेचा अधिकार आहे का ?" असा सुधारीत मुद्दा काढावा अशी

वादीने विनंती आहे.

**३.** सदरच्या अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल करून अर्ज कायद्याच्या तरतुदीशी विसंगत आहे तसेच अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयापर्यंत न्यायालय आल्यास त्यांना मुद्याच्या अनुषंगाने प्रतिवादिस वादीची उलटतपास घेणेस परवानगी असावी असे कथन केले आहे.

**४.** अर्ज तसेच म्हणणे याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा यु-क्तीवाद ऐकला. वादीच्या दाव्यातील कथनाचा विचार करता त्यामध्ये त्यांनी दावा मिळकतीत तोडून ठेवलेली झाडे ही वादीच्या मालकीची आहेत अशी हककप्रस्थापना करणेत यावी अशी विनंती केली आहे. वादीने अर्जामध्ये सुचवलेला सुधारीत मुद्दा काढणे दावा न्यायनिर्णीत करणेसाठी महत्वाचा आहे.

**५.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०९ च्या आदेश १४ , नियम ५ प्रमाणे

> *"Order XIV Rule 5 of the CPC empowers the Court to amend issues or frame additional issues before passing a decree if such issues may be necessary for determining the matters in controversy between the parties."*

सुधारित मुद्दा त्यांच्या कथनाच्या अनुषंगाने असल्यामुळे अधिक सुस्पष्टता येणारी आहे तसेच उभय पक्षातील वाद अंतीमरीत्या न्यायनिर्णीत करणेसाठी मदतच होणार

आहे. त्यामुळे सुधारित मुद्दा काढणे मला न्यायोचित वाटते. तसेच सदर मुद्याच्या अनुषंगाने प्रतिवादी यास उलट तपास घ्यावयाचा झाल्यास त्यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी देणे उचित वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादिस दाव्याच्या अनुषंगाने वादीचा उलटतपास घेण्यास परवानगी देणेत येत आहे.

सही/-

दिनांक: १५/ ०६/२०२३ (पी. आर. ढोरे )

कुडाळ सह दिवाणी न्यायाधीश, कुडाळ

रे. दी. मु. नं. ११२/२०१३ नि.९७

MHSI040004492013

**रे. दी. मु. नं. ११२/२०१३**

**सरस्वती सडवेलकर वि. सुधाकर सावंत**

**०/ नि.२५**

निशाणी ९७ वरील आदेशानुसार नि.२५ वरील मुद्दा क्र. ४ रद्द करुन सुधारित मुद्दा क्र. ४ खालील प्रमाणे काढणेत येत आहे.

**मुद्दा क्र. ४ :** “वादीस विनंतीप्रमाणे दावा मिळकतीमधील प्रतिवादीने तोडलेल्या झाडांचा वादी हा मालक आहे असा जाहीर ठराव करून मिळणेचा अधिकार आहे का ?”

सही/-

(पी. आर. ढोरे )

सह दिवाणी न्यायाधीश, कुडाळ

दिनांक: १५/ ०६/२०२३

कुडाळ